# <u>तालुका सब-जेल</u>

मुंबई पोलीस अधिनियम १९५१ कलम १७ अन्वये जिल्ह्यातील पोलीस दलावर, जिल्हा दंडाधिकारी या नात्याने जिल्हाधिकारी यांचे नियंत्रण असते. मुंबई पोलीस अधिनियम १९५१ कलम १९ अन्वये जिल्हा दंडाधिकारी पोलीस दलावर देखरेख करतात.
जिल्हा दंडाधिकारी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी जबाबदार आहेत. तसेच ते फौजदारी प्रशासनाचे प्रमुख आहेत. जिल्ह्यातील सर्व कार्यकारी दंडाधिकारी आणि पोलीस यंत्रणेवर जिल्हाधिकाऱ्यांचे नियंत्रण आणि देखरेख असते.

जिल्हा दंडाधिकारी या नात्याने जिल्ह्यातील जेल आणि कोठडी (lock-ups) प्रशासनावर देखरेखीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांचे आहेत. कारागृह अधिनियम १८९४, कलम ३(१) अन्वये उप-कारागृहांची तरतुद आहे. मुंबई कारागृह पुस्तिका, १९५५ (Bombay Jail Manual, 1955), अन्वये कारागृहाच्या सामान्य प्रशासनावर जिल्हाधिकाऱ्यांची देखरेख असते.
करागृहात असणाऱ्या कैद्यांसाठी रजा (फर्लो – furlough) मंजूर करण्याचे अधिकार पोलीस उप महानिरीक्षकांना आहेत तर अभिवचन रजा (पॅरोल- parole) मंजूर करण्याचे अधिकार विभागीय आयुक्त (महसूल) यांना आहेत.

सर्वसाधारणपणे फौजदारी कारवाईत पंधरा दिवस किंवा कमी कालावधीसाठी शिक्षा झालेले कैदी, बंदीवासासाठी अन्य ठिकाणी नेण्यात येणारे कैदी, चौकशी प्रलंबित असलेले कैदी उप-कारागृहात ठेवले जातात.

मुंबई कारागृह पुस्तिका १९५५, कलम ९ अन्वये, मामलेदार हा तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या उप-कारागृहाचा (sub-jail) 'अधिक्षक' असतो तर तालुका प्रशासनाचा (फौजदारी संकलन) कारभार पाहणारा लिपीक किंवा अव्वल कारकून 'जेलर' म्हणून काम पाहतो.

9. ~~There are 276 Taluka Sub Jails.~~ The Mamlatdar or Mahalkari of the Taluka or Mahal in which the Sub-Jail is situated is usually the Superintendent of the Jail. A clerk from the establishment of the Mamlatdar or Mahalkari is the Jailor.

स्वातंत्रपूर्व काळापासून महाराष्ट्रात उप-कारागृहाची पध्दत अस्तित्वात आहे. आणि उप-कारागृहांचे व्यवस्थापन महसूल खात्याकडे दिलेले आहे. कर्नाटक राज्यातही काही ठिकाणी ही पध्दत अस्तित्वात आहे.
महाराष्ट्रात उप-कारागृहाची विभागणी मुख्यालय उप-कारागृह आणि तालुका उप-कारागृह अशी करण्यात आली होती. मुख्यालय उप-कारागृहांचे संपूर्ण व्यवस्थापन जेल विभागाचे जेलर करीत असत तर तालुका उप-कारागृहांचे संपूर्ण व्यवस्थापन महसूल विभागाकडे देण्यात आले होते.
कालांतराने मुख्यालय उप-कारागृहाचे रूपांतर जिल्हा कारागृह वर्ग २ आणि वर्ग ३ मध्ये करण्यात आले आणि महानिरीक्षक, जेल यांच्याकडे थेट नियंत्रण सोपविण्यात आले.

राज्यातील उप-कारागृहांच्या व्यवस्थापनाची तरतुद उप-कारागृह पुस्तिका, १९५४ (Sub-Jail Manual, 1954) मध्ये दिलेली आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३, प्रकरण ८ (कलम १०६ ते १२४) अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करतांना, बंधपत्र देण्यास टाळाटाळ करणाऱ्या व्यक्तीस आवश्यकता वाटल्यास तालुका उप-कारागृहात ठेवण्याची तरतुद आहे. तालुका दंडाधिकारी, जे तालुका उप-कारागृहाचे अधिक्षकसुध्दा आहेत, ते अशी प्रकरणे हाताळतात.
उप-करागृहात खालील नोंदवह्या ठेवण्याची कायदेशीर तरतुद आहे.
**१) फॉर्म- ए:** खटला चालू असलेल्या (under-trial prisoners) कैद्यांची नोंदवही
**२) फॉर्म- बी:** शिक्षा झालेल्या (convicted prisoners) कैद्यांची नोंदवही
**३) फॉर्म- सी:** दैनंदिन एकूण (daily totals) कैद्यांची नोंदवही
**४) फॉर्म- इ आणि एफ:** बंदीवासासाठी अन्य ठिकाणी नेण्यात येणाऱ्या आणि शिक्षा झालेल्या (en-route under-trial and convicted prisoners) कैद्यांची नोंदवही
**५) आहार नोंदवही** (भत्ता- Diet): सर्व कैद्यांना दिवसभर देण्यात येणाऱ्या आहाराची नोंद यात असते.
**६) डेस्क नोंदवही (Desk diary):** येणाऱ्या आणि जाणाऱ्या कैद्यांची नोंदवही
**७) नोंदवही क्रमांक १३ (Register No. 13):** जेलरची अहवाल नोंदवही (Jailor's Report Book)
**८) नोंदवही क्रमांक १४ (Register No. 14):** शासकीय अधिकारी भेट नोंदवही
**९) नोंदवही क्रमांक २२(अ) (Register No. 22 (A))** – डेड स्टॉक नोंदवही:कारागृहात असणाऱ्या साहित्यांची नोंद. जुन आणि डिसेंबर महिन्यात ही नोंदवही अद्ययावत करण्यात येते.
**१०) नोंदवही क्रमांक ३२ (Register No. 32)** – वैद्यकीय अधिकारी भेट नोंदवही: वैद्यकीय अधिकाऱ्याने कारागृहास केव्हा व कोणत्या कारणासाठी भेट दिली हे नमूद करण्यासाठी

कारागृहाचे बांधकाम कसे असावे याबाबत महाराष्ट्र कारागृह (कारागृह बांधणे आणि स्वच्छता व्यवस्था नियम, १९६४ (Maharashtra Prisons (Prison Buildings and Sanitary arrangements) Rules, 1964) यात विस्ताराने माहिती देण्यात आली आहे.

तालुका उप- कारागृहाच्या संरक्षणाची जबाबदारी पोलीस विभागाची आहे. तालुका दंडाधिकारी या नात्याने तहसिलदार आणि उपविभागीय दंडाधिकारी या नात्याने उप विभागीय अधिकारी यांनी वेळोवेळी उप-कारागाची तपासणी करणे अपेक्षीत आहे. सध्याच्या काळात कोठडीतील आरोपींची आत्महत्या व मृत्यू यांच्या वाढत्या संख्येच्या पाऱ्श्वभूमीवर अशा तपासण्या आवश्यक झाल्या आहेत.

उप-कारागृहाची तपासणी करण्यासाठी विहित नमुना उपलब्ध नाही. तथापि, कारागृहांबाबत मानवी हक्क आयोगाचा सूचना आणि विविध संस्थांनी कारागृहांचे केलेले सर्वेक्षण या आधारावर मी उप-कारागृह तपासणी नमुना तयार केला आहे.
तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांनी उप-कारागृहाची तपासणी करतांना हा नमुना वापरण्यास हरकत नाही.

Dr SANJAY KUNDETKAR, Dy Collector

उप करागृहाची (sub-jail) तपासणी करतांना भरावयाचा फॉर्म नमुना

उप कारागृह तपासणी

तपासणी अधिकाऱ्याचे नाव:

तपासणी अधिकाऱ्याचा हुद्दा:

तपासणी दिनांक: / /२०　　　　　　　　　　तालुक्याचे नाव:

पोलीस ठाण्याचे नाव:

अंकीत असल्यास मूळ पोलीस ठाण्याचे नाव:

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याचे नाव:　　　　　　　　　　हुद्दा:

| | | | |
|---|---|---|---|
| | उप करागृह तपासणी फॉर्म | | |
| | तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम: | | |
| | मागील उप करागृह तपासणी कोणत्या महसूल अधिकाऱ्याने केली होती?<br>अधिकारी:<br>दिनांक: | | |
| | उप करागृहासाठी मंजूर सुरक्षा कर्मचारी | | |
| | सहाय्यक पोलीस फौजदार | मंजूर: | हजर: |
| | पोलीस हवालदार | मंजूर: | हजर: |
| | पोलीस शिपाई | मंजूर: | हजर: |
| | महिला पोलीस हवालदार | मंजूर: | हजर: |
| | महिला पोलीस शिपाई | मंजूर: | हजर: |
| | इतर: | | |
| १ | तपासणीच्यावेळी कर्तव्यावर हजर (ड्यूटीवर) असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांची माहिती:<br>नाव:<br>पद:<br>नाव:<br>पद:<br>नाव:<br>पद:<br>नाव:<br>पद: | | |
| २ | कारागृह सुरक्षा कर्मचारी किती पाळीत (Shifts) काम करतात?<br>वेळ काय? | | |
| ३ | उप करागृहासाठी एकूण किती खोल्या उपलब्ध आहेत? (संख्या) | | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | |
|---|---|---|
| ४ | या खोल्यांची अंदाजे लांबी, रूंदी, उंची किती आहे? | लांबी फूट<br>रुंदी फूट<br>उंची फूट |
| ५ | उप करागृहातील खोल्या स्वच्छ आहेत काय? | होय/नाही |
| ६ | उप करागृहात पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र खोल्या आहेत काय? किती? | होय/नाही<br>पुरूषांसाठी स्वतंत्र खोल्या:<br>महिलांसाठी स्वतंत्र खोल्या: |
| ७ | उप करागृहात आज रोजी किती आरोपी आहेत? | पुरूष: महिला: |
| ८ | सर्व आरोपींना उपकारागृहात ठेवण्यासाठी कायदेशीर अधिपत्र किंवा न्यायालयाचा आदेश उपलब्ध आहे काय? (याबाबत समक्ष खात्री करावी. कायदेशीर अधिपत्र किंवा न्यायालयाचा आदेश असल्याशिवाय कोणालाही कैदेत ठेवता येत नाही) | होय/नाही |
| ९ | उप करागृहाच्या खोलीत नैसर्गिक हवा आणि प्रकाश पुरेश्या प्रमाणात येतो काय? | होय/नाही |
| १० | उप करागृहाच्या खोलीत आरोपींना इजा होईल किंवा आरोपी स्वत:ला इजा करुन घेऊ शकतील अशा काही वस्तू/साधने आहेत काय? | होय/नाही |
| ११ | उप करागृहाच्या आवारत अग्निशमन व्यवस्था आहे काय? | होय/नाही |
| १२ | उप करागृहात आज रोजी असलेल्या आरोपींकडे काही आक्षेपार्ह वस्तू आढळून आली काय? | होय/नाही |
| १३ | आरोपींना उप कारागृहात ठेवतांना त्यांच्याकडील वस्तू/ऐवज काढून घेतला जातो काय? (उपस्थित आरोपींची झडती घेऊन खात्री करावी) | होय/नाही |
| १४ | आरोपींना उप कारागृहात ठेवतांना त्यांच्याकडील काढून घेतलेल्या वस्तू/ऐवज सुरक्षित ठेवला जातो काय? (अशा वस्तू/ऐवज ठेवलेल्या ठिकाणाची पाहणी करुन खात्री करावी) | होय/नाही |
| १५ | आरोपींकडून अशा काढून घेतलेल्या वस्तू/ऐवजांची नोंद ठेवली जाते काय? (अशी नोंदवही तपासावी आणि हजर आरोपींना विचारुन खात्री करावी) | होय/नाही |
| १६ | आरोपींसाठी तोंड धुणे, आंघोळ इत्यादी सोयी उपलब्ध आहेत काय? असल्यास, अशा सोयी उप कारागृहापासून अंदाजे किती अंतरावर आहे? | होय/नाही<br>अंतर: |
| १७ | आरोपींसाठी शौचालयाची सोय आहे काय?<br>असल्यास, उप कारागृहापासून ते अंदाजे किती अंतरावर आहे? | होय/नाही<br>अंतर: |
| १८ | सदर शौचालय सुरक्षित आहे काय? | होय/नाही |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector

| | | |
|---|---|---|
| | (शौचालयाची दारे, खिडक्या व परिसर यांची पाहणी करून आरोपी पळून जाण्यास किंवा स्वत:ला इजा करुन घेऊ शकेल याला वाव आहे किंवा कसे याची खातरजमा करावी) | |
| १९ | उप करागृहात असलेल्या आरोपींसाठी चहा, नाष्टा, जेवण पुरविण्याच्या वेळा काय आहेत? | चहा: सकाळी-<br>सायंकाळी-<br>नाष्टा: सकाळी-<br>जेवण: सकाळी-<br>सायंकाळी- |
| २० | उप करागृहात असलेल्या आरोपींसाठी चहा, नाष्टा, जेवण कोण पुरवितो? | कंत्राटदाराचे नाव:<br>पत्ता: |
| २१ | आरोपींना देण्यात येणाऱ्या चहा, नाष्टा आणि जेवणाचा दर्जा कसा आहे? | चांगला/ सामान्य / निकृष्ठ |
| २२ | उप करागृहातील आरोपींचे आवक जावक रजिस्टर ठेवले आहे काय? (रजिस्टर पाहून हजर आरोपींबाबत खात्री करावी.) | होय/नाही |
| २३ | उप करागृहाची सुरक्षा व्यवस्था समाधानकारक आहे काय? | होय/नाही |
| उप कारागृह प्रभारी यांची स्वाक्षरी व पद | | |
| तपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी पद व शिक्का | | |

Dr. SANJAY KUNDETKAR, Dy. Collector